नि.फौ.ख. क्रमांक. ४३८/२०२४
सरकार विरुध्द नवनाथ व इतर
निशाणी क्रमांक –५७

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – पूजा माधव मरपडवाड,
वय -२२ वर्षे, धंदा - शेती,
रा. धसवाडी, ता.अहमदपूर जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती काकडे</u>**

**०१.** मी धसवाडी येथे शेतात असलेल्या घरात राहते. घटना दिड वर्षोपुर्वी झाली, त्यादिवशी एकादशी होती. घटनेच्या दिवशी मी माझा पती व सासू फराळ करुन दुपारी ३.३० वाजण्याच्या दरम्यान घरा बाहेर बसलो होतो. त्यावेळी आरोपी नवनाथ हा फवारनी करत आमच्या बैलासमोर आला. माझ्या सास-यानी त्यांना फवारु नका असे म्हणाले. आरोपी आमची जमीन असल्याचे म्हणाले, आम्ही त्यांना आमची जमीन असल्याचे सांगितले. त्यानंतर इतर आरोपी आवाज ऐकून त्याठिकाणी काठ्या घेवून आले. आरोपी नवनाथ याने माझ्या सास-याला डोक्यात मारले. माझे पती सोडविण्यास गेले असता, आरोपी प्रकाश याने माझ्या पतीना काठीने पाठीत मारले. त्यावेळी माझी सासू सोडण्यास गेली असता, तिला आरोपी रुक्मीणी, पार्वती व शोभा यांनी मारले. त्यांनी सासूचे केस ओडले व पाठीत लाथा-बुक्यांनी मारले. आरोपी कोंडाबाई, निकिता व सारजा यांनी मला पोटात बुक्क्यांनी मारहाण केली, केसाला धरुन खाली पाडले होते. त्यानंतर आरोपी निघून गेले. जाताना आरोपी म्हणाले कि, शेतात पेरणी केल्यास तुम्हाला मारुन टाकु. ज्या काठ्यांनी मारहाण केली त्या मी ओळखू शकते. आता मला वस्तू-अ दाखविली. त्याच काठ्यांनी आम्हास मारहाण करण्यात आली. आरोपी पैकी नवनाथ, नागनाथ व कोंडाबाबाई हजर आहेत, इतर आरोपी हजर नाहीत. मी त्यांना ओळखते. पोलीसांनी माझे तपासटिपन नोंदविले होते. माझे पतींना ऐकू येत नसल्याने त्यांचा जवाब पोलीसांनी नोंदविला नव्हता.

**<u>आरोपीं तर्फे उलटतपास वकील श्री. एस.व्ही.देशमुख यांच्यामार्फत सुरु:-</u>**

**०२.** या शेताचे वादा बाबत न्यायालयात दावा चालू असल्याचे मला माहित नाही. वादातील शेताचा गट नंबर ४६५ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादातील शेत आरोपी नवनाथ यांच्या मालकीचे आहे. मी पोलीसांना आरोपी नवनाथ फवारनी करत आल्याचे सांगितले होते. मी पोलीसांना आरोपी कोंडाबाई, शारदा व निकीता यांनी पोटात बुक्कीने मारल्याचे सांगितले होते. मी पोलीसांना शेतात पेरणी केल्यास तुम्हाला मारुन टाकु असे आरोपी म्हणाले हे सांगितले होते. हा सर्व मजकूर माझ्या बयानात पोलीसांनी का नमुद केला नाही. याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त काठ्या आमच्या शेतातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, या काठ्या आम्ही पोलीसांना दिल्या. जप्त काठ्या

पोलीसांना कोणी दिल्या हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी माझा पती व सासू फराळ करुन दुपारी ३.३० वाजण्याच्या दरम्यान घरा बाहेर बसलो होतो. त्यावेळी आरोपी नवनाथ हा फवारनी करत आमच्या बैलासमोर आला., हे म्हणणे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास-यानी त्यांना फवारु नका असे म्हणाले. आरोपी आमची जमीन असल्याचे म्हणाले, आम्ही त्यांना आमची जमीन असल्याचे सांगितल, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर इतर आरोपी आवाज ऐकून त्याठिकाणी काठ्या घेवून आले. आरोपी नवनाथ याने माझ्या सास-याला डोक्यात मारले. माझे पती सोडविण्यास गेले असता, आरोपी प्रकाश याने माझ्या पतीना काठीने पाठीत मारले. त्यावेळी माझी सासू सोडण्यास गेली असता, तिला आरोपी रुक्मीणी, पार्वती व शोभा यांनी मारले. त्यांनी सासूचे केस ओडले व पाठीत लाथा-बुक्यांनी मारले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कोंडाबाई, निकिता व सारजा यांनी मला पोटात बुक्क्यांनी मारहाण केली, केसाला धरुन खाली पाडले होते. त्यानंतर आरोपी निघून गेले, व जाताना आरोपी म्हणाले कि, शेतात पेरणी केल्यास तुम्हाला मारुन टाकु, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये सांगितल्याप्रमाणे कोणतेही घटना झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझी सासू असल्याने तिच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक -०१.१०.२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.